शनिवार, दि. २८ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २०७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

जनसेवा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

### सोशल मीडियावरून उभा राहणारा जनतेचा आवाज

## त्रिशूल पाटील आणि रविराज साबळे पाटील यांचे कार्य चर्चेत

**दीपक शेळके**

**जालना -** आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता तो जनतेच्या भावना, समस्या आणि संघर्ष व्यक्त करणारे प्रभावी व्यासपीठ बनला आहे. विशेषतः ग्रामीण भागातील प्रश्न मुख्य प्रवाहातील माध्यमांमध्ये अनेकदा दुर्लक्षित राहतात. अशा परिस्थितीत काही व्यक्ती स्वतःहून पुढे येत समाजातील वास्तव मांडण्याचे काम करताना दिसतात. त्यामध्ये सध्या रविराज साबळे पाटील आणि त्रिशूल पाटील ही दोन नावे विशेष चर्चेत आहेत.



**मुख्य प्रवाहाबाहेरील प्रश्नांना मिळतोय आवाज**

ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि वंचित समाजाच्या समस्या अनेकदा प्रशासकीय पातळीवर किंवा माध्यमांमध्ये पुरेशा प्रमाणात पोहोचत नाहीत. पिकांचे दर, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान, अपूर्ण सरकारी योजना, स्थानिक पातळीवरील भ्रष्टाचार हे प्रश्न वर्षानुवर्षे कायम आहेत.

अशा वेळी सोशल मीडियाचा वापर करून हे प्रश्न थेट लोकांसमोर आणि प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे काम रविराज साबळे पाटील आणि त्रिशूल पाटील सातत्याने करत आहेत. त्यांच्या पोस्ट्स आणि व्हिडिओंमुळे अनेक स्थानिक मुद्द्यांना व्यापक पातळीवर प्रसिद्धी मिळत असल्याचे दिसते.

**सत्ताधाऱ्यांना थेट सवाल लोकशाहीची खरी ताकद**

लोकशाही व्यवस्थेत सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. मात्र प्रत्यक्षात भीती, दबाव किंवा राजकीय प्रभावामुळे अनेक जण हे टाळतात. याउलट, त्रिशूल पाटील आणि रविराज साबळे पाटील यांनी निर्भीडपणे पुढे येत थेट प्रश्न विचारण्याची भूमिका घेतली आहे.

शेतकऱ्यांना हमीभाव का मिळत नाही?, सरकारी योजना लाभार्थ्यांपर्यंत का पोहोचत नाहीत?, ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा अपुऱ्या का आहेत? यासह विविध समस्या आणि सत्य परिस्थिती समाजापुढे मांडण्याचे काम हे दोघे करताहेत. अशा प्रश्नांमुळे प्रशासनालाही उत्तरदायित्वाची जाणीव होत असल्याचे जाणकारांचे मत आहे.

**धमक्या, दबाव आणि संघर्ष**

सामाजिक आणि राजकीय प्रश्न मांडताना विरोधाला सामोरे जावे लागणे ही नवीन गोष्ट नाही. सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या या दोघांनाही विविध प्रकारच्या दबाव आणि धमक्यांचा सामना करावा लागत असल्याच्या चर्चा आहेत. तथापि, या परिस्थितीतही त्यांनी आपली भूमिका कायम ठेवली आहे. यामुळे त्यांच्या कार्याकडे केवळ सोशल मीडिया ॲक्टिव्हिझम म्हणून न पाहता, सामाजिक बांधिलकी म्हणून पाहिले जात आहे. विविध स्तरातून त्यांना पाठींबा मिळत आहे. धमक्या आणि दबावालाही सोशल मिडीयातून उत्तरे दिली जात आहेत.

**नव्या पिढीसाठी दिशादर्शक उदाहरण**

आजची तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर सोशल मीडियावर सक्रिय आहे. मात्र त्याचा उपयोग केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता समाजातील प्रश्न मांडण्यासाठी कसा करता येतो, याचे उदाहरण त्रिशूल पाटील आणि रविराज साबळे पाटील यांच्या कामातून दिसून येते. त्यांच्या कार्यामुळे अनेक तरुणांमध्ये सामाजिक प्रश्नांविषयी जागरूकता वाढत असल्याचे चित्र आहे. सोशल मीडिया योग्य पद्धतीने वापरला, तर तो परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकतो, याची जाणीव त्यांच्या कामातून होते.

माध्यम विश्लेषकांच्या मते, ''डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे आता 'सिटिझन जर्नलिझम'ला मोठी चालना मिळाली आहे. ग्रामीण भागातील प्रश्न थेट लोकांपर्यंत पोहोचवण्याची ताकद या माध्यमात आहे. मात्र यासोबत तथ्य पडताळणी आणि जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे.''

**लोकशाहीच्या बळकटीसाठी आवश्यक आवाज**

लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सत्तेला प्रश्न विचारणारे आणि समाजातील वास्तव मांडणारे आवाज आवश्यक असतात. रविराज साबळे पाटील आणि त्रिशूल पाटील यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून हा आवाज बुलंद ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. धमक्या, दबाव आणि टीका यांना न जुमानता सुरू ठेवलेले त्यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. समाजातील प्रश्न मांडणारे असे आवाज केवळ व्यक्ती नसतात, तर ते लोकशाहीचे आधारस्तंभ ठरतात.

समाजातील प्रश्नांवर बोलणाऱ्या अशा व्यक्तींना पाठिंबा देताना माहितीची सत्यता तपासणे, सकारात्मक संवाद ठेवणे आणि रचनात्मक चर्चा घडवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.



## अर्थसंकल्पाचा चुकीचा अर्थ काढला

### जिल्हा परिषदेचा खुलासा



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषदेच्या नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पाबाबत काही ठिकाणी चुकीचा अर्थ लावला जात असून, यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने खुलासा करण्यात आला आहे.

प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधून अर्थसंकल्पातील तरतुदींबाबत अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषतः शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा विभागांतील उत्पन्नवाढीच्या उपाययोजनांबाबत चुकीचे निष्कर्ष काढले जात आहेत. त्यामुळे 'खासगीकरणाचा मार्ग मोकळा झाला' असा गैरसमज काही ठिकाणी पसरवला जात आहे.

मात्र, प्रत्यक्षात अर्थसंकल्पात शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी, मूलभूत सुविधा उभारण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी विविध तरतुदी करण्यात आल्या असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, काही शाळा भाडेतत्त्वावर देण्याचा प्रस्ताव हा स्थानिक स्तरावरील उपलब्ध संसाधनांचा अधिक परिणामकारक वापर करण्यासाठी विचाराधीन आहे. यामागील उद्देश शासकीय शिक्षण व्यवस्थेचे खासगीकरण नसून विकासकामांना गती देणे हा आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने स्पष्ट केले की, अर्थसंकल्पातील सर्व तरतुदी कायदेशीर व नियमानुसार असून, सार्वजनिक हिताला बाधा पोहोचेल असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. अपूर्ण माहितीच्या आधारे टीका करण्याऐवजी संपूर्ण अर्थसंकल्पाचा अभ्यास करूनच भूमिका मांडावी किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा परिषदेशी संपर्क साधावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली जिल्हा कोषागार कार्यालयाची वार्षिक तपासणी



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील तरतुदीनुसार मार्च २०२६ अखेर करण्यात येणाऱ्या वार्षिक तपासणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज दि. २७ मार्च २०२६ रोजी जिल्हा कोषागार कार्यालयास भेट देऊन तपासणी केली.

तपासणी दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा कोषागार अधिकारी पंजाबराव पुंडगे, लेखाधिकारी श्री. वनगुजरे, अप्पर कोषागार अधिकारी श्री. भिंगारे, श्री. झरेकर व श्री. वीर तसेच मुद्रांक प्रमुख श्याम मारोडे उपस्थित होते.

संबंधित अधिकाऱ्यांनी वार्षिक तपासणी संदर्भातील आवश्यक कागदपत्रे व नोंदी सादर केल्या.

तपासणीदरम्यान कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत जिल्हाधिकारी मित्तल यांनी कार्यालयाच्या एकूण कार्यपद्धतीचे कौतुक केले. तसेच, मार्च २०२६ अखेरच्या अनुषंगाने शासनाचे अनुदान व्यपगत होऊ नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच जिल्हा कोषागार कार्यालयाकडून शासनाच्या आर्थिक व्यवहारांची अचूक व पारदर्शक अंमलबजावणी होत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## रोजगार मेळाव्यात ११० तरुणांना मिळाली नोकरी

### धूत ट्रान्समिशनकडून २७ जणांना जागीच नियुक्तीपत्रे

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध करून देत, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि हुतात्मा जनार्दनमामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांनी ११० उमेदवारांची निवड केली असून, त्यांच्या करिअरला नवी दिशा मिळाली आहे.

या मेळाव्याचे मुख्य आकर्षण ठरले ते छत्रपती संभाजीनगर येथील धूत ट्रान्समिशन प्रा. लि. हे औद्योगिक गृह. या कंपनीने २७ पात्र उमेदवारांना निवडीनंतर तात्काळ नियुक्तीपत्रे देऊन त्यांच्या उत्साहात भर घातली.

शुक्रवार दि.२७ मार्च रोजी शासकीय आयटीआय जालना येथे हा मेळावा पार पडला. सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी शासकीय आयटीआयच्या प्राचार्या श्रीमती तृप्ती भोपे आणि उपप्राचार्या श्रीमती रजनी शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यात इयत्ता पाचवी ते दहावी, बारावी आणि आयटीआय (सर्व ट्रेड्स) उत्तीर्ण असलेल्या शेकडो उमेदवारांनी हजेरी लावली होती. मेळाव्यात एकूण ९ नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये असिस्टंट मॅनेजर, ब्रांच मॅनेजर, कॅशियर, टेक्निशियन, ऑपरेटर, फील्ड एक्झिक्युटिव्ह, हेल्पर आणि ए.सी.सी. मशीन ऑपरेटर अशा विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. एकूण ११० उमेदवारांना या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल परिहार यांनी केले, तर आभार प्रदर्शन एस. जी. चव्हाण यांनी केले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी आयटीआयचे गटनिदेशक एस. एस. कापसे, ए. एस. धाबे, बी. डी. वाणी यांच्यासह

कौशल्य विकास विभागातील भुजंग रिठे, अमोल बोरकर, आत्माराम दळवी, प्रदीप डोळे, योगेश बहुरे, नितीन लोकडे, कैलास काळे, रवींद्र पाड्मुख, विशाल जगरवाल, दीपक पालवे आणि गणेश सुपारकर यांनी विशेष परिश्रम घेतले. असेही कळविले आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात दि.३१ मार्च रोजी भगवान महावीर जयंती, २ एप्रिलला हनुमान जन्मोत्सव, ३ एप्रिल रोजी गुड फ्रायडे तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी आणि ५ एप्रिल रोजी इस्टर संडे या सण, उत्सव आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१ जानेवारी २०२६ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश ६ एप्रिल २०२६ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील.

## शनिवारी जिल्ह्यातील चार मंडळात समाधान शिबिराचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील नागरिकांच्या महसुली तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी आणि विविध शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या आदेशानुसार 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियान (टप्पा क्र. १) राबविण्यात येत आहे. मार्च ते मे २०२६ या कालावधीत तालुक्यातील विविध मंडळामध्ये या विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून याद्वारे प्रशासकीय सेवा थेट जनतेच्या दारात पोहोचवण्याचा मानस प्रशासनाने व्यक्त केला आहे. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहितेअंतर्गत प्रलंबित नोंदी अद्ययावत करणे, डिजिटल सेवा पोर्टलवरील प्रकरणांचा निपटारा करणे आणि 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' अंतर्गत तातडीने दाखले व सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महसुली अडचणींमुळे अडकलेली सर्वसामान्यांची कामे या शिबिरांच्या माध्यमातून मार्गी लागणार असल्याने ग्रामीण भागातील जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे. कार्यक्रमानुसार, शनिवार दि. २८ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्ह्यातील चार महत्त्वाच्या मंडळामध्ये ही शिबिरे पार पडणार आहेत. यामध्ये जालना तालुक्यातील विरेगाव मंडळातील साळेगव्हाण महादेव मंदिर, बदनापूर तालुक्यातील सेलगाव मंडळात जि.प. शाळा सेलगाव, अंबड तालुक्यातील वडीगोद्री मंडळातील श्री. गुरुदेव विद्यामंदिर वडीगोद्री आणि भोकरदन तालुक्यातील हसनाबाद मंडळातील मारोती मंदिर हसनाबाद या ठिकाणांचा समावेश आहे. नागरिकांनी आपल्या कामांशी संबंधित आवश्यक कागदपत्रासह या शिबिरांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी केले आहे.

## स्व. विनोद कळंबे यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य सदैव प्रेरणादायी

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** जाफराबाद तालुक्यातील आदर्श शिक्षक तथा सामाजिक कार्यकर्ते स्व. विनोद कळंबे यांचे शैक्षणिक, सामाजिक व पत्रकारितेतील योगदान सर्वांसाठी सदैव प्रेरणादायी राहील. युगंधर प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी गोरगरीब व गरजू लोकांना केलेली आर्थिक मदत ही सर्वांच्याच कायम स्मरणात राहील. शैक्षणिक व सामाजिक कार्यातील त्यांचे अधुरे स्वप्न पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. असे मत तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष पी.जी. तांबेकर यांनी व्यक्त केले. आदर्श शिक्षक स्व. विनोद कळंबे यांचे नुकतेच एका अपघातात निधन झाले. गुरुवारी येथील मानव सेवा मंडळातर्फे येथील महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयात आयोजित शोकसभेत ते श्रद्धांजली अर्पण करताना बोलत होते. यावेळी आदर्श शिक्षक शेख जमीर, माजी उपसरपंच फैसल चाऊस, प्रा. दत्ता देशमुख, शिक्षक सखाराम बोरकर, पवन झोरे, अलकेश सोमानी, डॉ. रमेश मोठे, प्रदीप मघाडे, मधुकर गोफणे, शेख साबेर, सावता तिडके, नसीम शेख आदींनी या शोकसभेत स्व. विनोद कळंबे यांच्या शैक्षणिक, सामाजिक व पत्रकारिता जीवनातील आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक म. फुले सार्वजनिक वाचनालयाचे रावसाहेब अंभोरे यांनी केले. या शोकसभेत मानव सेवा मंडळाचे प्रा. शैलीप्रकाश वाघमारे, गोविंद जाधव, संतोष शिंदे, गजानन डोमळे, संजय निकम, सुनील अंभोरे, भागाजी वाघमारे, पत्रकार सिताराम भाले, डॉ. अविनाश सुरसे, पत्रकार अशोक पाबळे, सुनील जोशी, फकरू कुरेशी, माजी उपसरपंच रहेमान शहा, सामाजिक कार्यकर्ते जनार्दन झोरे, पत्रकार शेख अशपाक, भिकाजी खांडेभराड, प्रदीप काबरा, अर्जुन राऊत, डॉ. हरणे, अनिकेत अंभोरे, धनंजय निकम, उमेश वराडे, शाहरुख पठाण, आशिष पैठणे, रामू जंगले, दगडूबा तांबेकर, शुभम मुळे, बालाजी शेवाळे, तय्यब चाऊस आदींसह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.



आदर्श शिक्षक स्व. विनोद कळंबे यांना श्रद्धांजली अर्पण करताना मानव सेवा मंडळ पदाधिकारी व ग्रामस्थ.

संपादकीय पान

## इंक्रेडिबल प्रीमियम लीग

जगातील सर्वाधिक महागडी आणि लोकप्रिय लीग म्हणून ओळखली जाणारी इंडीयन प्रीमियम लीग अर्थात आयपीएलच्या एकोणिसाव्या हंगामाची सुरुवात आजपासून म्हणजे २८ मार्च पासून होणार असून पुढील दोन महिने आयपीएलचा थरार चालू राहणार असल्याने क्रिकेट प्रेमींसाठी ती मोठी मेजवानी ठरणार आहे. आयपीएलची सुरुवात २००८ साली झाली. म्हणजे आज आयपीएलला अठरा वर्ष पूर्ण झाली. या अठरा वर्षात क्रिकेटच्या मैदानात आणि मैदानाच्या बाहेर अनेक घडामोडी घडल्या पण आयपीएलची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही. आयपीएललाही मॅच फिक्सिंग सारखी किड लागली होती. मॅच फिक्सिंगचा आरोप झाल्याने काही खेळाडूंना कायमचे घरी बसवण्यात आले तर चेन्नई आणि राजस्थान या सारख्या लोकप्रिय संघावर दोन वर्षाची बंदी घालण्यात आली होती. मॅच फिक्सिंग मुळे आयपीएलला उतरती कळा लागेल असा अंदाज बांधला जात होता मात्र तो फोल ठरला उलट आयपीएल आणखी लोकप्रिय ठरली. कोरोनाचा फटका जसा इतर क्रीडा प्रकारांना बसला तसाच तो आयपीएललाही बसला. कोरोनाच्या सावटातही बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन केले. कधी देशात तर कधी परदेशात, कधी प्रेक्षकांशिवाय तर प्रेक्षकांसह आयपीएलचे आयोजन करून बीसीसीआयने क्रिकेट प्रेमींना आयपीएलचा थरार अनुभवण्याची संधी दिली. जगभरातील इतर लीग कोरोनामुळे ठप्प झाल्या असताना बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन करून जगापुढे व्यवस्थापनाचा आदर्श घालून दिला. सुरवातीला आठ संघात खेळली जाणारी ही स्पर्धा दोन वर्षापासून दहा संघात खेळली जात आहे. गुजरात टायटन आणि लखनौ सुपर जायंटस या दोन नव्या संघाची आयपीएलमध्ये एंट्री झाल्याने आयपीएलचा थरार आणखी वाढला आहे. विशेष म्हणजे यातील गुजरात टायटन या संघाने पदार्पणातच विजेतपद मिळवत अनेकांना अचंबित केले इतकेच नव्हे सलग दोन वर्ष हा संघ अंतिम फेरीत पोहचला म्हणजे पदार्पणाच्या पहिल्या दोन वर्षातचच विजेतपद आणि उपविजेतपद मिळवत या संघाने आपले कर्तुत्व दाखवून दिले आहे. आयपीएलमध्ये दहा संघ असेल तरी आयपीएलवर चेन्नई आणि मुंबई या दोन संघाचेच वर्चस्व राहिले आहे. दोन्ही संघाने प्रत्येकी पाच विजेतपद पटकावित आयपीएलवर आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे. या दोघांशिवाय कोलकोता आणि हैद्राबाद या संघाने प्रत्येकी दोनदा विजेतपद मिळवले आहे तर राजस्थान आणि गुजरात या संघाने एकदा विजेतपदावर नाव कोरले आहे. मागील वर्षी म्हणजे २०२५ साली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या संघाने विजेतपद मिळवून आपल्या विजेतपदाचा दुष्काळ मिटविला. पंजाब, दिल्ली, लखनऊ या सारख्या प्रबळ संघांना मात्र अद्याप एकदाही विजेतपदाला गवसणी घालता आलेली नाही यावर्षी आयपीएलला नवा विजेता मिळेल का ? याची उत्सुकता क्रिकेटप्रेमींना लागूली आहे. अर्थात यावर्षीही चेन्नई आणि मुंबई हेच दोन संघ विजेतपदासाठी प्रबळ दावेदार आहेत. याशिवाय कोलकाता, बंगळुरू आणि गुजरात हे देखील विजेतपदाच्या शर्यतीत आहेत. कदाचित यावेळी एखाद्या नव्याच संघाने विजेतपद पटकावून सर्वांना अचंबित केल्यास आश्चर्य वाटायला नको. या वेळेची स्पर्धा एका नव्या कारणाने देखील चर्चेत आहे ती म्हणजे या वेळी अनेक संघांनी आपले कर्णधार बदलले आहे. ज्या धोनी आणि रोहित शर्माने आपल्या संघाला पाच विजेतपद मिळवून दिले त्यांना यावेळी फक्त खेळाडू म्हणून मैदानात उतरावे लागेल कारण मुंबईच्या संघ व्यवस्थापनाने रोहित शर्माच्या जागेवर हार्दिक पांड्याची कर्णधार म्हणून निवड केली आहे तर धोनीने स्वतः कर्णधार पदाचा त्याग केल्याने युवा ऋतुराज गायकवाडच्या गळ्यात चेन्नईच्या कर्णधारपदाची माळ पडली आहे. गुजरात संघाच्या कर्णधार पदाची धुरा युवा शुभमन गीलच्या खांद्यावर आहे. कोलकोताचा कर्णधार अनुभवी अजिंक्य रहाणे हा आहे तर मागील वर्षी कोलकताचा कर्णधार असलेला श्रेयस अय्यर यावेळी पंजाब सुपर किंग्सचा कर्णधार आहे तर जीवघेण्या अपघातातून बाचवलेला ऋषभ पंत लखनऊचा कर्णधार असून दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेल आहे. युवा रजत पाटीदारकडे बंगळुरूने नेतृत्व सोपवले तर ईशान किशनकडे हैदराबादची तर रियान परागकडे राजस्थानचे नेतृत्व सोपवून संघ मालकांनी त्यांच्यातील नेतृत्व गुणाला चालना दिली आहे. याच युवा खेळाडूंपैकी एखादा खेळाडू भविष्यात भारतीय संघाचे नेतृत्व करू शकतो म्हणजे भविष्यातील भारतीय संघाच्या कर्णधाराची पायाभरणी याच आयपीएल मधून होणार आहे. केवळ कर्णधारच नव्हे भविष्यातील संपूर्ण भारतीय संघच आयपीएल मधून निवडला जाईल. आज जे खेळाडू भारतीय संघात दिसतात ते सर्व खेळाडू आयपीएल मधूनच पुढे आले आहेत. भारतीय संघातील सूर्यकुमार यादव, जडेजा, शूभमन गिल, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, जसप्रीत बुमाराह, कुलदीप यादव, यजुवेंद्र चहल, वॉशिंगटन सुंदर, मोहंमद सिराज, संजू सॅमसन, ईशान किशन, वरुण चक्रवर्ती, अभिषेक शर्मा, ऋषभ पंत असे सर्वच खेळाडू आयपीएलची देण आहे. आयपीएलमध्ये चांगली कामगिरी केल्यानेच या खेळाडूंना भारतीय संघात प्रवेश मिळाला. आयपीएल म्हणजे भारतीय संघात प्रवेश करण्याचे प्रवेश द्वार आहे त्यामुळेच आयपीएल मध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी खेळाडू मैदानावर घाम गाळतात. आयपीएल मध्ये चांगली कामगिरी करून भारतीय संघात प्रवेश मिळवण्याचे स्वप्न सारे खेळाडू पाहतात ते स्वप्न यशस्वी करण्यासाठी ते जीवाचे रान करतात त्यामुळेच आयपीयलचे सर्व सामने रंगतदार होतात आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येतो. यावर्षीही आयपीएलचे सर्व सामने रंगतदार होतील आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येईल यात शंका नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# ‘महाराष्ट्र माझा, मुंबई कुणाची’ विचार करायला भाग पाडणारी नाट्यकृती

छत्रपती शिवाजी महाराज की जय आणि जय महाराष्ट्र अशा दमदार घोषणा देत दोन मराठी तरुण रंगमंचावर येतात.... आणि ‘महाराष्ट्र माझा, मुंबई कुणाची’ या शीर्षकाने नवी नाट्यकृती सादर करण्यास सुरुवात करतात. विषय मराठी माणसाच्या अस्मितेचा, अस्तित्वाच्या प्रखर लढ्याचा आणि त्यासाठी हौतात्म्य पत्करून रक्त सांडल्याचा. मोठ्या एलईडी पडद्यावर आधिनिक तंत्रज्ञानातून साकारलेल्या चित्रफितींना संहितेची आणि अभिनयाची जोड मिळते आणि पडदा पडतो तेव्हा प्रेक्षक अंतर्मुख होऊन स्वतःलाच विचारतो. माझा जन्म ज्या महाराष्ट्रात झाला, ज्या राज्याला देदीप्यमान इतिहास आणि भूगोल आहे त्या राज्यात मी आहे, परंतु त्या राज्याची राजधानी असलेली मुंबई कुणाची आहे आणि त्या मुंबईत मी कुठे आहे ?

स्वातंत्र्यानंतर भारतीय संघराज्यातील एक स्वतंत्र राज्य म्हणून महाराष्ट्राची १ मे १९६० ला स्थापना झाली; पण महाराष्ट्र हे नाव मात्र गेल्या दोन हजार वर्षांपासून प्रचलित आहे.महाराष्ट्र. नावातच राष्ट्र असणारे आणि स्वाभाविकपणे संकुचितपणाला थारा न देणारे राज्य...स्वतंत्र भारतात भाषा हा आधार मानून राज्यांची पुनर्रचना झाली, तेव्हा महाराष्ट्रावर अन्याय होत असल्याची भावना बळावली. त्या असंतोषातून उभी राहिली संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, त्या चळवळीला बहुतांशी यश मिळाले आणि आजचे महाराष्ट्र राज्य १०७ हुतात्म्यांच्या बलिदानातून अस्तित्वात आले. स्वाभिमानाने आणि शर्थीने मिळविलेला तो महाराष्ट्र आज कुठे आहे ? सध्या सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. प्रत्येक मराठी आणि महाराष्ट्रप्रेमी व्यक्तीच्या भावनांशी थेट नातं जोडणारा विषय या नाटकात प्रभावीपणे मांडण्यात आला आहे.

संस्कृती कला प्रतिष्ठान आणि लोकजागर नाट्य संस्था निर्मित या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन संदिप जंगम यांनी केले आहे. संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील विविध घटनांचा आढावा घेत, या कलाकृतीतून त्या काळातील संघर्ष, बलिदान आणि मराठी अस्मितेचा अभिमान उलगडला जातो. मुंबई मराठी माणसाच्या हातातून हिसकावून घेण्याचे, मराठी माणसांना किंबहुना अवघ्या महाराष्ट्राला वस्तुस्थितीची जाणीव करून देणारा विषय मांडण्याचा प्रयत्न यातून केला असावा. संयुक्त महाराष्ट्राचा लढा हे महाराष्ट्राच्या जीवनातले एक रोमांचकारी असे पर्व होते. या पर्वात महत्त्वाचा होता तो विचार. हा लढा विचारांचा होता. मराठी अस्मितेचा होता. स्वाभिमानाचा होता.

नाटक पाहताना कधी पूर्वजांच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटतो, तर कधी महाराष्ट्र आणि मुंबईसाठी हौतात्म्य पत्करलेल्या वीरांच्या कथा डोळे पाणावून टाकतात. त्याचबरोबर आजच्या महाराष्ट्राची आणि विशेषतः




मुंबईतील मराठी माणसाच्या स्थानाची वास्तव स्थितीही या नाटकातून अधोरेखित केली जाते.

गावागावातून मुंबईत आलेल्या मराठी माणसांच्या कष्टावर उभी राहिलेली ही नगरी आज बदलत चालली आहे. ‘‘मुंबई आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची’’ असा ठाम आवाज देणाऱ्या मराठी जनतेच्या पार्श्वभूमीवर आजच्या परिस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत हे नाटक विचार करायला भाग पाडते. गिरगाव, लालबाग, परळ, दादर यांसारख्या मराठी वस्तींच्या भागात आज मराठी माणूस किती उरलाय, हा सवालही या कलाकृतीतून उपस्थित केला जातो. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे या मागणीसाठी अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. आज त्या मुंबईत जगताना मराठी माणसाची घुसमट होत असल्याचे आणि मुंबई परप्रांतीयांची सताड खुली झाल्याचे चित्र आपण अनुभवतो आहोत. मराठी माणसांच्या आणि मुंबईच्या अस्तित्वाचा हा विचार प्रगल्भपणे मांडताना या कलाकृतीतून ठामपणे संदेश दिला जातो कि, मराठी माणसा, तुझी मुंबई वाचव ! ही तुझ्या अस्तित्वाची शेवटची लढाई आहे.

मराठी बाणा काय असतो, जगाला पुन्हा समजू दे. कष्ट तुझे, हक्क तुझा,तरीही का तू मागे ?

ही शेवटची लढाई आहे हरलास जर आता, तर इतिहासही साक्ष देणार नाही !

आजही तेच डाव टप्प्याटप्प्याने राबवले जात आहेत. उठ, लढ आणि जिंक !

दिग्दर्शकाने रंगमंच, नाट्य आणि पार्श्वभूमीवरील स्क्रीन यांचा अत्यंत सर्जनशील वापर केला आहे. विशेष म्हणजे, कृत्रिम बुद्धिमत्ता () चा वापर करून सादर केलेले दृश्य नाटकाला एक वेगळाच आयाम देतात. ही शैली प्रेक्षकांना नाट्यचित्र माध्यमाचा नवा अनुभव देणारी ठरते. विशेष म्हणजे ह्या नाट्यकृतीला आदेश बांदेकर आणि उदय सबनीस यांचं निवेदन आहे.

नाटकाला रोहन पाटील यांचे संगीत लाभले असून प्रकाशयोजना राजेश शिंदे यांनी केली आहे. चित्रफितींची जबाबदारी प्रसाद सोनावणे आणि हर्ष राऊत यांनी सांभाळली आहे. शाहीर मनोहर गोलांबरे आणि रविंद्र खोमणे ह्यांनी गायन केलं आहे. गणेश जाधव आणि संदिप जंगम यांचा प्रभावी अभिनय नाटकाला अधिक बळकटी देतो. या नाट्यकृतीची निर्मिती महेश भोसले आणि संदिप जंगम यांनी केली आहे. व्यावसायिक रंगभूमीवर वेगळे आणि विचारप्रवर्तक विषय हाताळण्याचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. प्रेक्षकांनी या अनोख्या आणि आशयघन नाट्यकृतीचा आस्वाद घ्यावा, तसेच पुढील पिढीला महाराष्ट्राच्या इतिहासाची आणि अस्मितेची जाणीव करून देण्यासाठी हे नाटक आवर्जून दाखवावे, असे आवाहनही करण्यात येत आहे.

# महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य पद पत्रकारांना सुध्दा मिळावे

महापालिका,नगरपालिकेप्रमाणे राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य नेमले जाणार आहेत.या संदर्भातील महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या ( दुसरी सुधारणा ) विधेयक मंगळवार दिनांक १७ मार्च २०२६ ला विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले याचे मनापासून स्वागत. कारण हे सामाजिक कार्याच्या दृष्टिकोनातून सरकारने उचलेले अत्यंत महत्वाचे आणि योग्य पाऊल आहे याची जितकी प्रशंसा केली जाईल तितकी कमी आहे.सामाजिक कार्य करणारे अनेक क्षेत्रातील निष्ठावंत, विचारवंत, सामाजिक बांधिलकी व समाजासाठी झटणारे वेगवेगळ्या क्षेत्रातील समाजसेवक सुद्धा असतात आणि आहेत त्यांचे कार्य अफाट असते परंतु दिसत नाही,ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.यात प्रामुख्याने पत्रकार, लेखक, साहित्यिक, डॉक्टर,वकिल, कलाकार,स्वतंत्र पत्रकार,सीए, निवृत्त शिक्षक, विचारवंत, पर्यावरण प्रेमी,निवृत्त अग्निशमन अधिकारी, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी, पर्यावरण प्रेमी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या सतत सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्यांचा स्वीकृत सदस्यांमध्ये समावेश होने अत्यंत गरजेचे आहे.याच अनुषंगाने देशाचा ‘‘चौथास्तंभ‘‘असलेला पत्रकार यांची सामाजिक कार्याची जाणीव लक्षात घेऊन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पुढील दृष्टिकोनातून विकासाची वाटचाल प्रबळ व्हावी व समाजाला योग्य न्याय मिळावा या दृष्टिकोनातून प्रत्येक क्षेत्रात पत्रकारांना स्वीकृत सदस्य पदाचा मान मिळायलाच हवा.कारण पत्रकारांचे कार्य ग्रामीण,शहर, जिल्हा,राज्य,राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत मोठ्या प्रमाणात असते याचा फायदा महानगरपालिका,नगरपालिका, जिल्हा परिषदा,पंचायत समित्यांना चांगल्या प्रकारे होऊ शकतो ही बाब नाकारता येत नाही.कारण याबाबतचा पत्रकारांना सखोल अभ्यास व दांडगा अनुभव असतो याचा फायदा राज्याच्या ग्रामीण आणि शहराच्या विकासामध्ये व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अवश्य होईल असा मला दृढ विश्वास आहे. ज्याप्रमाणे सरकारने स्वीकृत सदस्य पदाचे विधेयक एकमताने मंजूर केले त्याचप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात पत्रकारांना स्वीकृत सदस्य पदाचा मान मिळावा या दृष्टिकोनातून मुख्यमंत्री महोदय आपण अवश्य पाऊल उचलावेत अशी या पत्राद्वारे विनंती करण्यात येत आहे.असे जर झाले तर राज्याचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल व चौथ्यास्तंभाचा सन्मान उंचावेल.यावर सन्माननीय मुख्यमंत्री महोदय आपण अवश्य गांभीर्याने विचार कराल व पत्रकारांना राज्यात स्वीकृत सदस्य पदाचा बहुमान देऊन राज्याला गौरवान्वित कराल.आपण माझ्या या विनंती पुर्वक पत्राचा अवश्य विचार कराल अशी मला खात्री आहे. धन्यवाद.जय हिंद!जय महाराष्ट्र.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**६३ बी, शिवनगर, नागपूर -९.**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जालना येथे ऑनलाइन लिव्ह अँड लायसन्स नोंदणी ग्राहकांसाठी डोकेदुखी

## अधिकारी लाच घेतल्याशिवाय कागदपत्रे मंजूर करत नाहीत

**जालना । प्रतिनिधी -** शासनाने नागरिकांची सोय व्हावी आणि पारदर्शकता यावी या उद्देशाने सुरू केलेली ऑनलाइन लिव्ह अँड लायसन्स (भाडेकरार) नोंदणी प्रक्रिया जालन्यात नागरिकांसाठी मनस्तापाचे कारण ठरत आहे. सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन सादर करूनही, जोपर्यंत नागरिक दुय्यम निबंधक कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन अधिकाऱ्यांशी ‘‘अर्थपूर्ण‘‘ व्यवहार करत नाहीत, तोपर्यंत त्यांची नोंदणी मंजूर होत नसल्याच्या गंभीर तक्रारी पुढे येत आहेत. या प्रकारामुळे सरकारच्या डिजिटल इंडियाच्या ध्येयालाच सुरुंग लागत आहे.

ऑनलाइन प्रणालीचा मुख्य उद्देश हा नागरिकांना घरबसल्या, कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय आणि कमीत कमी वेळेत भाडेकरार नोंदणी करता यावी, हा होता. मात्र, जालना येथील संबंधित विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी या प्रक्रियेत अनेक अडथळे निर्माण केले आहेत. ऑनलाइन अर्ज सादर केल्यानंतर, अनेक दिवस तो प्रलंबित ठेवला जातो. काही वेळा क्षुल्लक त्रुटी काढून अर्ज परत पाठवला जातो. जेव्हा त्रस्त नागरिक कार्यालयात चौकशीसाठी जातात, तेव्हा त्यांना लाचेची मागणी केली जात असल्याचे अनेक नागरिकांचे म्हणणे आहे.

या गंभीर समस्येवर बोट ठेवत अ‍ॅड. महेश धन्नावत यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अ‍ॅड. धन्नावत नावत यांच्या मते, ‘‘सरकार जेव्हा एखादी नवीन ऑनलाइन सेवा सुरू करते, तेव्हा त्या प्रणालीशी संबंधित अधिकाऱ्यांना विश्वासात घेणे अत्यंत आवश्यक आहे. जर अधिकाऱ्यांच्या असहकार्यामुळे आणि भ्रष्ट मानसिकतेमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असेल, तर त्या सेवेचा काहीही उपयोग नाही. सरकारने एकतर अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी किंवा ही प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी अधिकाऱ्यांकरिता थेट कमिशन किंवा सेवा शुल्क निश्चित करावे, जेणेकरून कागदपत्रांची मंजुरी वेळेवर मिळेल आणि नागरिकांची आर्थिक पिळवणूक थांबेल.‘‘

या संपूर्ण प्रकरणाची दखल अखिल भारतीय ग्राहक परिषदेने घेतली असून, परिषदेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे लवकरच तक्रार दाखल करण्यात येणार आहे. एका तक्रारदाराने नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर सांगितले की, ‘‘सर्व कागदपत्रे योग्य असूनही माझा अर्ज गेल्या तीन आठवड्यांपासून प्रलंबित आहे. कार्यालयात संपर्क साधल्यावर साहेब नाहीत किंवा नंतर या अशी उत्तरे मिळतात. मात्र, तिथे गेल्यावर पैशांची मागणी केली जाते.‘‘ ही केवळ एका व्यक्तीची समस्या नसून, अनेक जण या अनुभवातून जात आहेत.

या प्रकारामुळे शासनाच्या ऑनलाइन सेवांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अखिल भारतीय ग्राहक परिषद या प्रकरणी सर्व पुरावे गोळा करून जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करणार आहे आणि या भ्रष्ट कारभाराची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी करणार आहे. जर यावर तातडीने उपाययोजना केली नाही, तर नागरिकांचा शासनाच्या ऑनलाइन प्रणालीवरील विश्वास उडेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# मनपाची प्रतिबंधित प्लास्टिकविरोधी कारवाई; १० क्विंटल प्लास्टिक जप्त!



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आपली मोहीम अधिक तीव्र केली असून, आज दि. २७ मार्च रोजी शहरातील नवीन मोंढा परिसरात मोठी धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत महानगरपालिकेच्या स्वच्छता पथकाने सुमारे १० क्विंटल प्रतिबंधित सिंगल युज प्लास्टिक जप्त केले असून, संबंधित दुकानदारांकडून ३०,००० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

महानगरपालिकेच्या सर्व स्वच्छता निरीक्षकांनी एकत्रितपणे नवीन मोंढा बाजारपेठेत ही शोधमोहीम राबवली. यामध्ये श्री. पारसमल मोहनलाल जैन, महालक्ष्मी ट्रेडर्स व इतर काही प्रतिष्ठानांकडे प्रतिबंधित प्लास्टिकचा मोठा साठा आढळून आला. शासनाने प्रतिबंधित केलेले सिंगल युज प्लास्टिक बाळगणे आणि त्याची विक्री करणे या कारणास्तव ही दंडात्मक कारवाई करण्यात आली. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार, १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक कॅरी बॅग्ज तसेच सिंगल युज प्लास्टिकच्या वस्तू वापरणे, बाळगणे आणि विक्री करणे हा कायदेशीर गुन्हा आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी ही बंदी घालण्यात आली असून, जालना महानगरपालिकेमार्फत यापुढेही अशी जप्तीची मोहीम अधिक कठोरपणे राबवण्यात येणार आहे.

‘‘शहरातील सर्व व्यापारी, विक्रेते आणि नागरिकांनी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही मोठी दंडात्मक कारवाई आणि कायदेशीर प्रक्रिया केली जाईल. स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त जालन्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे. असे आवाहन अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांनी केले आहे.

### प्रेरणा फाउंडेशनचा ८ वा वर्धापन दिन उत्साहात

# ‘भारत गौरव पुरस्कार २०२६’ वितरण सोहळा दिमाखात संपन्न

**बदलापूर । प्रतिनिधी -** सामाजिक कार्यात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ‘प्रेरणा फाउंडेशन, महाराष्ट्र’ या संस्थेचा ८ वा वर्धापन दिन सोहळा बदलापूर येथील सत्कर्म बालकाश्रमात मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी ‘भारत गौरव पुरस्कार २०२६’ वितरण सोहळाही दिमाखात पार पडला.

प्रेरणा फाउंडेशन (रजि. क्र. ५६४/एफ/बदलापूर/ठाणे/महाराष्ट्र) या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे नेतृत्व संस्थापिका व अध्यक्षा सौ. प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले. दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. संजीव जैन (चीफ इन्फॉर्मेशन ऑफिसर, इंटेग्रेवोन कंपनी), श्री. अविनाश म्हात्रे (अध्यक्ष, कुष्ठरोग दीनदयाळ संस्था), सौ. रजनी लुंगसे (प्रसिद्ध समाजसेविका), श्री. धनजी पवार, सौ. अश्विनी कसबे, श्री. मोहन शुक्ला, श्री. मोहन कदम (पत्रकार व समाजसेवक), सौ. माधुरी भोईरकर, लोकशाहीर भीमराव ठोगिरे, ज्येष्ठ गायक व आकाशवाणीचे माजी संचालक श्री. रघुनाथ फडके तसेच उद्योगपती श्री. राजेश भांगे आदी मान्यवर उपस्थित होते.

या मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना ‘भारत गौरव पुरस्कार २०२६’ प्रदान करण्यात आला. समाजकार्यातील योगदानाबद्दल गौरव करण्यात आलेल्या मान्यवरांचा सत्कार करताना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमात एक विशेष आकर्षण म्हणजे श्री. अविनाश म्हात्रे यांच्या ‘‘जुनी नाणी संग्रह’’ या पुस्तकाचे प्रकाशन सोहळा देखील पार पडला. या पुस्तकामुळे इतिहास व नाणेसंग्रह क्षेत्रात रस असलेल्या अभ्यासकांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

यावेळी प्रेरणा नाट्यमंडळाच्या माध्यमातून २६ एप्रिल रोजी सादर होणाऱ्या नाटकासाठी तिकीट विक्रीची घोषणा करण्यात आली. या नाटकातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग ९० टक्के अपंगत्व असलेल्या मोहिनी बुमावर या मुलीच्या उपचारासाठी करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. यासाठी नागरिकांनी तिकीट खरेदी करून सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले.

प्रेरणा फाउंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील वंचित, गरजू, अनाथ, भटके व आदिवासी घटकांसाठी विविध उपक्रम राबवत आहे. आदिवासी पाड्यांमध्ये रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, स्वच्छता अभियान, अनाथालय व वृद्धाश्रमांना मदत, रस्त्यावरच्या निराधारांना आधार देणे अशा विविध उपक्रमांद्वारे संस्था समाजसेवेचा वसा जपत आहे. तसेच प्रेरणा रंगमंच नाट्यमंडळ व प्रेरणा इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून उभारण्यात येणारा निधी कॅन्सरग्रस्त, किडनीग्रस्त व मतिमंद रुग्णांच्या मदतीसाठी वापरला जातो.



कार्यक्रमाला सत्कर्म आश्रमचे अध्यक्ष नामदेव पेशने व आश्रम समिती सदस्यांचीही उपस्थिती होती. तसेच संस्थेचे सचिव वैभव कुलकर्णी, खजिनदार कु. रोहन गावकर, श्री. शैलेश सणस, श्री. हर्षल शिंदे, सौ. उर्मिला चौधरी, श्री. मंगेश सावंत आदींचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या शेवटी संस्थापिका सौ. प्रेरणा कुलकर्णी यांनी उपस्थित सर्व मान्यवर, सहकारी व नागरिकांचे आभार मानले.

लोकशाहीर भीमराव ठोगिरे यांच्या जोशपूर्ण पोवाड्याने वातावरण भारावून गेले आणि अल्पोपहारासह कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**अपंग मुलीच्या मदतीसाठी आवाहन**

मोहिनी बुमावर या मतिमंद व ९०% अपंग मुलीच्या उपचारासाठी आयोजित नाटकाच्या तिकीट विक्रीतून मदत केली जाणार असून, नागरिकांनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले असून या ९३७०८००८४२ क्रमांकावर संपर्क साधणढयाचे आवाहन केले आहे.

## कै. बाबुराव जाफराबादकर माध्यमिक शाळेत स्वसंरक्षणाचे धडे



**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** कै.बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालयांमध्ये महिला व बालकल्याण विभाग तसेच बेटी बचाव बेटी पढाव यांच्या अंतर्गत विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. यावेळी प्रशिक्षक दत्ता पवार, वनिता पिंपरे यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी स्वतः जवळ असलेले हेअर पिन,दप्तर, मोबाईल,पेन,, नखे, दात,याचा वापर करून स्वतःची सुरक्षा करू शकता असे सांगून प्रात्यक्षिक करून दाखविले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती. मीनाक्षी कुलकर्णी, शिक्षक संदीप इंगोले, मदन सोजे,भीमाशंकर जवळेकर, प्रगती भालेकर, अलकनंदा गाडेकर,जगदीश डोईफोडे , राजाराम साबळे वंदना नन्नवरे शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीची उत्सव समिती स्थापन

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील बुद्ध बिहार येथे झालेल्या एका बैठक मध्ये या वर्षीची डॉ बाबासाहेब आंबेडकर उत्सव समिती ची स्थापना करून कार्यकारणी घोषित करण्यात आली.या वेळी अध्यक्ष आशिष पैठणे यांची निवड करण्यात आली असून त्याच्या सोबत उपाध्यक्ष
गणेश म्हस्के
सचिव किरण कासारे
कोषाध्यक्ष शालिक काकडे
सहकोष्याध्यक्ष प्रदिप काकडे
सल्लागार संदिप भिसे
सदस्य: जितेन्द्र म्हस्के,सुनिल मघाडे,अशोक मघाडे, राहुल जाधव,दिपक शिंदे,संदिप मघाडे, गौतम गायकवाड, विनोद काळे,मिलिंद म्हस्के,विजय म्हस्के,आकाश पैठणे,समाधान मघाडे,सोनु पैठणे, प्रेम हिवाळे, कपिल जाधव,संदिप दांडगे, गौतम



कांबळे, राहुल बनसोडे,किरण मघाडे, अनिल गायकवाड, प्रशांत शिंदे, राकेश जाधव सुरेश चंदनशिवे ही मंडळी कार्यकारणीत घेण्यात आली आहे. या वेळी विविध कार्यक्रम आयोजन केल्याचे समिती सदस्य यांनी सांगितले.

या समिती मध्ये कार्याध्यक्ष गौतम म्हस्के,गणपत पैठणे,गुड्डु मघाडे,किसनराव मघाडे,सतिष चंदनशिवे साहेब,दिनकर ससाने सर,शैलीप्रकाश वाघमारे या वरिष्ठ मंडळी ची निवड करण्यात आली आहे.




# लोकवर्गणीतून बांधली जिल्हा परिषदेची कॉर्पोरेट लूक असणारी शाळा

## शिक्षण दर्जेदार असल्यानं बाहेरील जिल्ह्यातून विद्यार्थी घेताहेत शाळेत ॲडमिशन, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेतही प्रचंड सुधारणा

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील अनेक ठिकाणी जिल्हा परिषद शाळांच्या इमारती जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या असताना जालन्यातील लालवाडी तांडा येथे लोकवर्गणीतून कॉर्पोरेट लूक असणारी शाळा बांधण्यात आलीय.जालन्यातील स्टील उद्योजकांच्या मदतीसह शिक्षक आणि गावकऱ्यांनी घेतलेल्या पुढाकारातून ही शाळा बांधण्यात आलीय.या शाळेत १ली ते ४ थी पर्यतचे वर्ग आहेत. २० लाख रुपये खर्चून या शाळेचं बांधकाम पूर्ण करण्यात आलंय. शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी डिजिटल शिक्षणावर शिक्षकांनी भर दिल्यानं विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत चांगलीच वाढ झालीय.शाळेत दर्जेदार शिक्षण दिलं जात असल्यानं बाहेरच्या जिल्ह्यातील विद्यार्थी देखील या शाळेत ॲडमिशन मिळवण्यासाठी धडपडतायत.

राज्यात अनेक जिल्हा परिषदेच्या शाळांची दयनीय अवस्थाय.कुठे शाळा मोडकळीस आल्यात. कुठे इमारती जीर्ण झाल्यात. तर अनेक ठिकाणी शिक्षक कांची संख्या कमी असल्यानं शिक्षक पालक हतबल आहेत. अशातच जालना जिल्ह्यातून एक सकारात्मक बातमी समोर आलीय.जालन्यातल्या लालवाडी तांडा येथील ही जिल्हा परिषदेची शाळा पाहा. शाळेच्या समोर जाताच ही शाळा रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्याचं लक्ष वेधून घेते. कधी काळी या शाळेची अवस्था देखील वाईटच होती. पण शिक्षक,गावकरी आणि जालन्यातील स्टील कंपन्यांनी या शाळेच्या बांधकामासाठी पुढाकार घेतला आणि २० लाखांच्या वर्गणीतून फुलांच्या वेलांनी सजलेली ही कॉर्पोरेट लूक असणारी शाळा नावारुपाला आली.

**सचिन खिल्लारे,मुख्याध्यापक, लालवाडी जिल्हा परिषद शाळा,**

०२: शाळेच्या समोरच विद्यार्थ्यांसाठी बेंच बसवण्यात आले.याच बेंचवर बसून विद्यार्थी टॅब हातात घेऊन शिक्षणाचे धडे गिरवतात. प्रत्येक वर्गात स्मार्ट टीव्ही बसवण्यात आलाय.प्रत्येक वर्गात घरापेक्षाही जास्त स्वच्छता दिसून येते.वर्गात जाण्याआधीच बूट बाहेर काढुन रॅकमध्ये ठेवले जातात. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार चांगल्या दर्जाचा असावा असा नियम शिक्षकांनी स्वतःलाच घालून दिलाय. त्यामुळे शाळेचं किचन देखील मॉड्युरल, दिमाखदार आणि शिस्तबद्ध असल्याचं पाहायला मिळतं.विद्यार्थ्यांसाठी बाथरूम, टॉयलेट आणि फ्रेश झाल्यानंतर आरशांची देखील व्यवस्था करण्यात आलीय.एका साध्या तांड्यावर असलेल्या या शाळेत ३३ विद्यार्थी शिक्षण घेतायत.पण शिष्टबद्ध शाळा असल्यानं बाहेरील जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना देखील या शाळेची ओढ लागलीय.

शाळेत एवढ्या सगळ्या सुविधा आणि शिक्षकांची बारकाईने विद्यार्थ्यांना समजावून सांगण्याची पद्धत यामुळे विद्यार्थी देखील अभ्यासात केव्हानाच पुढे




गेलेत.१ ली ते ४ थी पर्यंतचे विद्यार्थी इंग्रजी, मराठी,गणित ,विज्ञानात तरबेज झालेत.

राज्यात एका बाजूला जिल्हा परिषद शाळेच्या इमारती आणि गुणवत्ता यावर सतत प्रश्न उपस्थित केले जातात.मात्र शिक्षक आणि गावकरी यांनी पुढाकार घेतला तर चित्र बदलून असं कॉर्पोरेट पध्दतीचं देखील होऊ शकतं हेच यातून दिसून येतं हे नक्की



**सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन योगा ॲण्ड नॅचरोपॅथी नियामक मंडळाचे सदस्य अनंत बिरादार हे जालना दौऱ्यावर आले असता त्यांचे शासकीय विश्रामगृह येथे स्वागत करतांना निसर्गोपचार तज्ज्ञ धनसिंह सुर्यवंशी, ॲड. ईश्वर बिल्होरे. यावेळी डॉ. लक्ष्मण माने, डॉ. शेख शकील, डॉ. नारायण अंभोरे, डॉ. विजय जौजंळ आदींची उपस्थिती होती.**

रामनवमी उत्सवात राजकीय आरोप-प्रत्यारोप

# माजीचे आजी झाले आता माजी करण्याची जबाबदारी गजानन तौर मित्रमंडळाची

## कैलास गोरंटयाल यांची अर्जुन खोतकरांवर टीका

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात आयोजित श्रीराम नवमी उत्सव सोहळ्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले असून, माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी माजी मंत्री अर्जुन खोतकर यांच्यावर जोरदार टीका केली. ''अर्जुन खोतकरांना माजी आमदार करण्याची जबाबदारी गजानन तौर मित्रमंडळाची आहे,'' असे वक्तव्य करत गोरंटयाल यांनी थेट निशाणा साधला.

गजानन तौर मित्रमंडळाच्या वतीने आयोजित श्रीराम नवमी उत्सव सोहळ्यात गोरंटयाल यांनी आपल्या भाषणात खोतकर यांच्यावर गंभीर आरोप केले. त्यांनी म्हटले की, ''या वर्षीच्या रामनवमी उत्सवात खोतकरांनी आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला. पोलिसांकडून परवानगी घेताना आयोजकांकडून बॉण्ड लिहून घेण्यात आला, ज्यामुळे अनावश्यक अडचणी निर्माण झाल्या.''

यावेळी आमदार नारायण कुचे, महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, भास्कर दानवे, रविंद्र, तौर, दिनेश भगत, अक्षय गोरंटयाल, निलेश गोल्डे, आशिष चव्हाण, शंकर घोडके आदींची प्रमुख उपस्थिती होती.

गोरंटयाल यांनी एक शेरोशेअर ‘ कुछ बात हैं हममे, मिटटी नही हसती हमारी, सदयों से रहा दुशमन जहाँ हमारा’ म्हणत ''पूर्वी अर्जुन खोतकर हे याच कार्यक्रमात सहभागी होत, श्रेय घेत आणि उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवत असत. मात्र आता परिस्थिती बदलली असून, गजानन तौर यांच्या निधनानंतर कल्याणी तौर यांच्या मार्गात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.'' त्यांनी असेही नमूद केले की, गजानन तौर मित्रमंडळाने गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवत शहरात वेगळी ओळख निर्माण केली आहे. मात्र, या कार्यात राजकीय हस्तक्षेप होऊ लागल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढत आहे.



''गजानन तौर यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणाऱ्या कल्याणी तौर यांना सहकार्य करण्याऐवजी अडथळे निर्माण केले जात आहेत. त्यामुळेच आम्ही ठामपणे सांगतो की, अर्जुन खोतकरांना माजी आमदार करण्याची जबाबदारी आता गजानन तौर मित्रमंडळाची आहे,'' असा इशाराही गोरंटयाल यांनी दिला.

या वक्तव्यानंतर जालना शहरातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, आगामी काळात या वादाला आणखी तीव्रता येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रामनवमीसारख्या धार्मिक उत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेले हे आरोप-प्रत्यारोप राजकीय वातावरण अधिक तापवणारे ठरत आहेत.

दरम्यान, या टीकेवर अर्जुन खोतकर यांची प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नसून, त्यांच्या उत्तराकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वीज ग्राहकांना दिलासा; दरवाढ होणार नाही


**मुंबई -** महावितरणच्या २०२५-२६ ते २०२९-३० या पाच आर्थिक वर्षांच्या बहुवार्षिक वीजदर याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आपला आदेश आज प्रसिद्ध केला आहे. महावितरणने () पाच वर्षात वीजदर () कपातीसाठी मांडलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक अशा सर्व प्रवर्गातील ग्राहकांसाठीचे वीजदर २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने दरवर्षी कमी होणार आहेत. कोणत्याही प्रवर्गात वीजदर वाढणार नाहीत. महावितरणच्या याचिकेवर आयोगाने गेल्या वर्षी मार्च अखेरीस एक आदेश दिला होता. त्या आदेशाला स्थगिती देण्यात आली होती. महावितरणच्या पुनर्विचार याचिकेनुसार आयोगाने जून २०२५ मध्ये एक आदेश दिला होता. त्या आदेशाला काहीजणांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर बोट ठेऊन जूनचा आदेश रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयानेही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे पालन करून व तांत्रिक बाबी पूर्ण करून आदेश देण्याची सूचना नोव्हेंबरमध्ये केली होती. त्यानुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या पुनर्विचार याचिकेवर जनसुनावणी करून, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे पालन करून व सर्व तांत्रिक बाबी पूर्ण करून आता आदेश दिला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाले आहे. तसेच आता २०३० पर्यंतच्या वीजदराबाबत स्पष्टता आली आहे.

# श्रीराम नवमी निमित्त प्रल्हादपुर (परतूर) येथे भव्य शोभायात्रेत उसळला हिंदू जनसागर; एकतेचा दिमाखदार आविष्कार

## १३ व्या वर्षातील शोभायात्रा अधिक भव्य; नरसिंह झाकी, कराटे प्रात्यक्षिके व आतिषबाजीने वेधले लक्ष

**परतूर । प्रतिनिधी -** श्रीराम नवमीच्या पावन पर्वानिमित्त प्रल्हादपुर (परतूर) येथे हिंदू एकता दिवस २०२६ अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेत हजारोंच्या संख्येने हिंदू बांधव-भगिनी सहभागी झाले असून संपूर्ण परिसर ''जय श्रीराम''च्या घोषणांनी दुमदुमून गेला. यावर्षी १३ व्या वर्षात पदार्पण केलेल्या या शोभायात्रेने भव्यता, शिस्त आणि सांस्कृतिक वैभवाचा अनोखा संगम घडवून आणला. या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले अयोध्या येथील श्रीरामलल्ला यांची सुमारे ८ फ ूट उंच भव्य बालस्वरूपातील श्रीमूर्ती, ज्याचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती त्या रथाची आकर्षक तयारी स्वयंसेवक अनिल देशपांडे यांनी सुन्दर सिंहासन बनवून शोभा वाढवली , तसेच इतिहासकालीन प्राचीन संबळ पथकाचे दमदार सादरीकरण, नरसिंह अवताराची जिवंत झाकी, भव्य ध्वज पथकाचे शिस्तबद्ध संचलन, सातोकान कराटेची प्रभावी प्रात्यक्षिके, ढोल-ताशांचा गजर, आकर्षक धून, पुष्पवृष्टी व दिव्य आतिषबाजी यामुळे शोभायात्रेला अधिकच आकर्षक आणि दिमाखदार स्वरूप प्राप्त झाले. दुपारी ४ वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उड्डाणपूल येथून शोभायात्रेला माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर साहेब यांच्या शुभ हस्ते भव्य शुभारंभ होऊन ती शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत श्री महादेव मंदिर येथे पोहोचली तिथे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ स्वयंसेवक सुभाष अण्णा अंभुरे,अशोकराव मसलकर, सोपानराव जगताप,माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया,प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर,नितीन भैया जेथलिया, महेश भैया नळगे,शहाजी राक्षे,माधवमामा कदम,मोहन अग्रवाल, विनायकराव काळे आणि पुढे सर्व हिंदू बांधव-भगिनी यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध समाजातील प्रतिनिधी मान्यवर शहराच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा प्रियंका ताई राक्षे, उपनगराध्यक्षा विशाखा ताई विजय राखे,सुभाषराव काळे, सुरमा सिंह,ॲड. सुरेश काळे, आनंद कोटेचा,नितीन ओवळे, डॉ.प्रमोद आकात, विशाल घोडे, हनुमंत दवंडे,कुलदीप





बिनगे मान्यवर तसेच ध्वज पूजन साधू संत मान्यवर ह.भ.प.नामदेव महाराज शास्त्री व माता भगिनी यांच्या उपस्थितीत करण्यात आले तसेच सर्व संघटना सर्वपक्षीय मान्यवरांच्या उपस्थितीत श्री खंडोबा मंदिर (गाव भाग) येथे हनुमान चालीसा पठण व भव्य महाआरतीने शोभायात्रा समारोप करण्यात आला. या दरम्यान ठिकठिकाणी भाविकांनी थंड पेय, नाश्ता व फराळाची उत्कृष्ट व्यवस्था करून सेवा भावाचे दर्शन घडवले. या भव्य शोभायात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी सावता काळे, अर्जुन जगताप, आनंद कोटेचा, सुरेश दसमले, जयवंत हातवणकर, मनोज मसलकर, सचिन काटे, कुणाल बन्सीले, सौरभ नरवैये, आकाश राजपूत, अभिजीत जोशी,सखाराम कुलकर्णी, अजित पोरवाल, डॉ.स्वप्नील मंत्री, अविनाश राऊत,संभाजी घनवट, नारायण लांडगे,आदित्य देशपांडे, विकास मोरे,कुणाल राजपूत, सिद्धेश्वर लहाने, ओमकार माने, कुणाल शहाणे, कुलदीप बिनगे, योगेश खंडेलवाल, मुन्ना चित्तोडा, प्रणय मोर, अमोल अग्रवाल, कैलास चव्हाण, ज्ञानेश्वर माने, राहुल माने, कुलदीप लईतबर, वैभव देशपांडे, युवराज ताजी, युवराज भुंजा, सुमित काबरे, विशाल भुसारे, शुहास राजपूत,माऊली ठोंबरे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमातून प्रल्हादपुर (परतूर) येथे हिंदू समाजाची एकजूट, श्रद्धा आणि संस्कृतीचे भव्य दर्शन घडत ''जाती-पाती बाजूला ठेवून हिंदू सारे एक होऊ'' हा संदेश प्रभावीपणे जनमानसात पोहोचला.

# जालना शहरातील दिव्यांगांसाठी मासिक मानधनाची मागणी

## महापौर वंदना मगरेंना शासन जीआरसह निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील दिव्यांग नागरिकांना दरमहा मानधन सुरू करावे, या मागणीसाठी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या वतीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. शहरातील महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या दिव्यांगांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनत चालल्याने त्यांना आर्थिक आधार मिळावा, या हेतूने संघटनेने जालन्याच्या महापौर वंदना मगरे यांना शासनाच्या संबंधित जीआरची प्रत जोडून सविस्तर निवेदन सादर केले.

सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जालना शहरातील अनेक दिव्यांग नागरिक अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. शारीरिक अडचणींमुळे त्यांना नियमित रोजगार मिळणे कठीण जाते. परिणामी, त्यांच्या कुटुंबावर आर्थिक ताण वाढत असून, दैनंदिन गरजा भागविणेही कठीण होत आहे. अशा परिस्थितीत शासनाने दिव्यांगांसाठी ठोस उपाययोजना करून त्यांना दरमहा निश्चित मानधन देण्याचा निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.




संघटनेने निवेदनासोबत शासनाचा जीआर जोडत, त्याअनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांनीही पुढाकार घेऊन शहरातील दिव्यांगांसाठी योजना राबवाव्यात, असे आवाहन केले आहे. महानगरपालिकेच्या स्तरावरून विशेष निधी उपलब्ध करून देत दिव्यांगांना आर्थिक सहाय्य देण्याची गरज असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, ''दिव्यांग नागरिकांना केवळ सहानुभूती नव्हे, तर ठोस आर्थिक मदतीची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे स्थानिक पातळीवरून थेट मानधन सुरू केल्यास त्यांच्या जीवनमानात मोठा बदल घडू शकतो.'' महापौर वंदना मगरे यांनी निवेदन स्वीकारून याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती संघटनेच्या प्रतिनिधींनी दिली. तसेच हा प्रस्ताव महानगरपालिकेच्या सभेत मांडून पुढील निर्णय घेण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

या निवेदनावर संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, सतीश फतपुरे, अनिल मगदुले, सुरेश बोर्डे, शेख इस्माईल आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, शहरातील दिव्यांगांच्या प्रश्नांवर लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या मागणीमुळे जालना शहरातील दिव्यांगांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून, येत्या काळात याबाबत ठोस निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.